नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १९/०६/२०२५ (गुरूवार)**

---

## पोलीस स्टेशन परशिवणी अंतर्गत खुनचा गुन्हा उघड ,अज्ञात आरोपीचा शोध घेवुन आरोपीला केली अटक

**पोलीस स्टेशन पारशिवणी** :— दिनांक ०८/०६/२०२५ चे रात्री २१:०० वा ते २१:१५ वा. चे सुमारास मौजा खंडाळा (डुमरी) शिवारातील आशिर्वाद राईस मिल जवळील मनसर ते नागपुर एन.एच. ४४ रोड वरील भंडारा कॅनल चे पुला जवळ मृतक नामे **हिरालाल लक्ष्मण पुरे वय ५८ वर्ष रा. खंडाळा (डुमरी), ता. पारशिवनी** यांचा कोणीतरी अज्ञात आरोपीने, अज्ञात कारणाने, कोणत्यातरी धारदार हत्याराने त्यांचे गळ्यावर व पोटावर वार करुन त्यांना जिवानिशी ठार केले होते. सदर प्रकरणी पोलीस स्टेशन पारशिवनी येथे अज्ञात आरोपी विरूध्द अपराध क्रमांक २६०/२०२५ कलम १०३(१) भा.न्या.सं. अन्वये खुनाचा गुन्हा नोंद आहे.

सदर गुन्हयाची उकल करण्याकरिता मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामिण जिल्हा यांचे मार्गदर्शनात श्री. रमेश बरकते, उपविभागीय पोलीस अधिकारी, रामटेक यांचे नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखा व उपविभागातील पोलासांची वेगवेगळी तपास पथके तयार केली. सदर पथकांनी वेगवेगळया अंगानी व दिशेने गुन्हयाच्या तपासास सुरुवात केली. यातील मृतक हा त्यांच्या साथीदारांसह खमारी, उमरेड येथे शंकरपट पाहण्यासाठी गेला होता. तेथे त्यांच्यात काहीवाद विवाद होउन त्यांचा खून झाल्याची शक्यता गृहित धरुन पारशिवनी, रामटेक, देवलापार परिसरातून शंकरपट पाहण्यासाठी गेलेल्या लोकांकडे कसुन चौकशी करण्यात आली. तसेच घटनास्थळावर मृतक येण्यापूर्वी काही इसम तेथे दारु पित बसले होते, अशी माहिती मिळाल्याने एका पथकाकडुन त्याबाबत कसुन तपास केला असता, दारु पिणारे मृतक येण्यापुर्वीच तेथुन निघुन गेल्याचे निष्पन्न झाले. याशिवाय मृतक श्री. हिरालाल पुरे हे नुकतेच सेवानिवृत्त झाले असल्याने त्यांचे बॅक खात्यावर पेन्शन ची रक्कम जमा झाली होती. त्यामुळे घर कुटुंब किंवा गावातील मित्र परिवार यांचे सोबत त्यांचा काही वाद विवाद होता काय? याचीही चाचपणी

करण्यात आली. त्यानंतर मयतास घटनास्थळा जवळील टपरीतील चाकुने मारले असल्यास त्या दिशेने तपास केला. येण्या—जाण्याच्या मार्गावरील व परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासणी व काही साक्षीदारांची विचारपूस केली असता, एक इसम गाडीतील पेट्रोल संपल्याने घटनास्थळावर व फोडलेल्या टपरी जवळ घटने दरम्यान रेंगाळताना दिसल्याचे समजल्याने सीसीटीव्ही फुटेज मधील त्या संशयित इसमाचा फोटो साक्षीदारांना दाखवुन खात्री पटल्यानंतर त्या इसमाचा शोध सुरु केला. मनसर मध्ये त्या इसमाने काही लोकांशी संपर्क केल्याचे स्पष्ट झाल्याने त्या इसमांचा शोध घेउन त्यांचेकडे विचारपूस केली असता एका अनोळखी फोननंबरवर संशयिताने फोन केल्याचे उघड झाले. त्या फोन धारकाचा शोध घेउन विचारपूस केली असता संशयित इसम हा सुरज बिसन टेकाम रा.कच्चेखानी ता. खैरलांजी, जि. बालाघाट येथील असल्याचे निष्पन्न झाले. सदर इसम हा फिरतीवर मजुरी करतो व तो फोन वापरत नाही, असे माहीत झाल्याने त्याच्या छायाचित्रासह शोधपत्रिका सर्व सोशल मिडियावर प्रसारीत केली व सर्व पोलीस पाटील यांची बैठक घेउन संशयिताचा शोध घेण्याबाबत सक्त सुचना दिल्या.

दि.१८/०६/२०२५ रोजीचे रात्री सदर इसम हा मौजा चिचोली ता. पारशिवनी परिसरात लपुन बसलेला असल्याबाबत खबर मिळाल्याने पारशिवनी पोलीसांनी सापळा रचुन त्यास ताब्यात घेतले. त्यानंतर आरोपीकडे गुन्हयासंदर्भात विचारपुस केली असता त्याने यातील मृतक इसम याचे कडे पेट्रोलकरिता २००/— रू. मागितले होते. मात्र मृतक हिरालाल पुरे यांनी पैसे न दिल्याने त्याचा राग आल्याने त्यास ठार मारल्याचे कबुल करुन त्याच्या खिशातील पैसे घेउन पेट्रोल टाकुन तो नागपुरला निघुन गेल्याचे सांगितले. पारशिवणी पोलीसांनी आरोपी **नामे सुरज बिसन टेकाम वय २४ वर्षे,रा. कुही** याला अटक केली असुन **दिनांक २५/०६/२०२५ रोजी पर्यंत आरोपीचा पोलीस कोठडी रिमांड मंजुर झाला आहे.** गुन्हयाचा पुढील तपास पारशिवनी पोलीस करीत आहेत.

## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## २० गोवंश जनावरांची सुटका, उमरेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन उमरेड** :— दिनांक १९/०६/२०२५ रोजी उमरेड पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, मोहपा कडुन उमरेड कडे अवैधरित्या जनावरांची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी उमरेड ते मोहपा रोडवर मौजा मोहपा शिवार येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान **१० चक्का एलपी ट्रक क्रमांक एम. एच. १४ सी.पी. ८३४९** मिळुन आला. पोलीसांनी वाहन थांबवुन चालकाने नाव पत्ता विचारले असता **आरोपी क्रं १ चालक नामे जावेद बेग समिम बेग मिर्झा, वय ३४ वर्षे, रा. हनुमान मंदीर,१३४ संगम नगर,उप्पलवाडी, नागपुर अशी माहीती समजली**. पोलीसांनी वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये **२० गोवंश जनावरे** असे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. आरोपीला जनावरे खरेदी विक्री पावती बाबत विचरणा केली असता त्याचे कडे कोणतेही कागदपत्रे नव्हती.तसेच जनावरांच्या मालकाबाबत विचारपुस केली असता नमुद गोवंश जनावरे हे **आरोपी क्रं २ मोहम्मद महफुज कुरेशी, रा. पापाखान बगिच्याजवळ ,कोळसा टोल, कामठी याच्या मालकीचे असुन त्याच्याच सांगण्यावरून जनावरांची वाहतुक करीत असल्याबाबत माहीती आरोपी क्रं १ ने दिली. पोलीसांनी पंचासमक्ष १० चक्का एलपी ट्रक क्रमांक एम. एच. १४ सी.पी. ८३४९ किंमती १२,००,०००/— रूपये. व २० गोवंश जनावरे किंमती ६,००,००० /— रूपये असा एकुण किंमती १८,००,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला. सुटका केलेल्या २० गोवंश जनावरांना पालन पोषणाच्या दृष्टीकोणातुन गोसंर्धन संस्थेत दाखल करण्यात आले आहे.**

**नमुद प्रकरणी वर नमुद आरोपी क्रं १ आणि २ यांच्या विरूध्द महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम सहकलम प्राण्यांचा छळ अधिनियम सहकल कलम १३०/१७७ मो.वा.का. अन्वये गुन्हा नोंद केला आहे.**



## दुकानाचे कुलुप तोडुन चोरी (घरफोडी) करणाऱ्या आरोपीस २४ तासाचे आत केले अटक,मौदा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन मौदा:—** पोलीस स्टेशन मौदा येथे फिर्यादी नामे लक्की चमरूलाल मात्रे, वय ३६ वर्षे, रा. जयस्तंभ चौक मौदा, जि. नागपूर यांनी रिपोर्ट दिली की, दिनांक १५/०६/२५ चे २०.०० ते दिनांक १६/०६/२५ चे १०.०० दरम्यान फिर्यादीचे मोबाईलचे दुकानाचे तसेच सचिन कृषी केंद्राचे दरवाज्याचे लॉक तोडून फिर्यादीचे मोबाईल दुकानातील सिपी प्लस कंपनीचा सिसीटीव्ही कॅमेराचा डिव्हीआर आणि रोख रक्कम ३०००/— रूपये तसेच सचिन कृषी केंद्रातून रोख रक्कम ६००/— रूपये असा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात इसमाने चोरून नेला. फिर्यादीच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन मौदा येथे अप क्रं ४५६/२०२५ कलम ३०५(ए), ३३१(४) भा.न्या.सं अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

वरीष्ठांच्या मार्गदर्शनात मौदा पोलीसांनी तात्काळ सदर गुन्हयाचा तपास सुरू केला. पोलीस स्टेशन मौदा येथील डि.बी. पथकाने गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे **आरोपी नामे सचिन उर्फ भुऱ्या राजेश ठाकरे, वय २६ वर्षे, रा. ओम साईनगर, मौदा याचा गुन्हा दाखल झाल्यापासुन अवघ्या २४ तासाचे आत शोध घेवुन त्याला दिनांक १९/०६/२०२५ रोजी**

**अटक केले.** आरोपीच्या ताब्यातुन गुन्हा करते वेळी वापरलेली मोटार सायकल एम.एच. ४० बी. एक्स १४४८, गुन्ह्यात वापरलेले साहित्य तसेच चोरी केलेला संपुर्ण मुद्देमाल असा एकुण कि. ५६,०८०/— रूपयांचा मुद्‌देमाल जप्त केला आहे.



## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद
## खापरखेडा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन खापरखेडा** :— दिनांक १८/०६/२०२५ रोजी खापरखेडा पोलीसांना रात्रगस्त दरम्यान गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. अशी माहिती पोलीसांनी सर्तकतेने पेट्रोलींग करून, भानेगाव ते रेल्वे क्रॉसिंग रोड वर टाटा ट्रक क्रमांक एम.एच. ४० बी.जी. ५०३६ या वाहनाला थांबवुन त्याची तपासणी केली असता त्यात रेती मिळुन आली. **चालक आरोपी नामे दिनेश शामराव उपवंशी, वय २१ वर्षे, रा वार्ड क्र ०९, कोरडी नागपूर** याला रेती वाहतुक परवान्याबाबत विचारणा केली असता

त्याच्याकडे कोणताही परवाना नव्हता. वाहन मालकाबाबत विचारपुस केली असता **सदर वाहन त्याचेच मालीकीचे असल्याचे त्याने पोलीसांना सांगितले.** पोलीसांनी पंचासमक्ष **१)** टाटा ट्रक क्रमांक एम.एच. ४० बी.जी. ५०३६ किंमती १२,००,०००/— रूपये **व २)** ५ ब्रास रेती किंमती २५,०००/— रूपये आणि असा एकुण १२,२५,०००/—रूपयेचा मुद्देमाल जप्त केला.

**वाहन चालक/मालक आरोपी नामे दिनेश शामराव उपवंशी, वय २१ वर्षे, रा वार्ड क्र ०९, कोरडी नागपूर याच्या विरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम, सहकलम सहकलम १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

## अवैधरित्या रेतीची चोरी करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद उपविभागिय पोलीस अधिकारी ,नागपुर विभाग यांची कामगिरी

दिनांक १८/०६/२०२५ रोजी श्री दिपक अग्रवाल, सहा. पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, नागपुर विभाग यांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, उमरेड रोडनी बुटीबोरी कडे टिप्पर क्रमांक एम.एच. ४० बी.एफ. ९८८९ मध्ये अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे श्री. दिपक अग्रवाल हे त्यांच्या पथकासह तात्काळ सदर टिप्परचा शोध घेणे कामी रवाना झाले. श्री दिपक अग्रवाल हे त्यांच्या पथकासह उमरेड रोडने पेट्रोलींग करीत असतांना मौजा देवळी गुजर गावाचे शिवारातील एच.पी. पेट्रोलपंप जवळ **टिप्पर क्रमांक एम.एच. ४० बी.एफ. ९८८९** मिळुन आला.वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यात रेती दिसली. वाहन चालक आणि क्लिनर यांना नाव पत्ता विचारले असता **आरोपी क्रं १) वाहन चालक नामे चेतन भैय्याजी श्रीरामे, वय २८ वर्षे, रा. मोहपा, ता.उमरेड जि. नागपुर आणि आरोपी क्रं २) क्लिनर नामे सुजित गोविंदा डडमल, वय १९ वर्षे, रा.आंबेनरी, ता चिमुर, जि चंद्रपुर अशी माहीती प्राप्त झाली**. दोघांना **रेती वाहतुक परवान्याबाबत विचारणा केली असता त्यांच्याकडे कोणताही परवाना नव्हता**. वाहन मालकाबाबत विचारपुस केली असता **आरोपी क्रं ३) वाहन मालक नामे नागेश सुरेश बावनकर, वय ४२ वर्षे, रा.कावळापेठ उमरेड, जि. नागपुर** अशी

माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष वहनामधुन १) ७ ब्रास रेती किंमती ४०,०००/— रूपये आणि २) टिप्पर क्रमांक एम.एच. ४० बी.एफ. ९८८९ किंमती ४०,००,०००/— रूपये असा एकुण **४०,४०,०००/—रूपया**चा मुददेमाल जप्त केला आहे.

**सदर प्रकरणी वर नमुद आरोपी क्रं १ ते ३ यांच्या विरूध्द पोस्टे बोरी येथे कलम ३०३(२) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम, सह कलम १३०/१७७ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

## अंमली पदार्थ प्रतिबंध मोहीमे अंतर्गत अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या १२ आरोपीतांविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये १२ गुन्हे नोंद

**पोलीस स्टेशन देवलापार**:— पोलीस स्टेशन देवलापार अंतर्गत दिनांक ११/०६/२०२५ ते १६/०६/२०२५ रोजी पर्यंत बिल्लारीवाले बाबा व सखी पीर बाबा मोरफाटा दर्गा उर्स निमित्य पोलीसांचा बंदोबस्त होता. मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात अंमली पदार्थ प्रतिबंध मोहीमे अंतर्गत पोलीसांनी मौजा मोरफाटा दर्गाचे मागे अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या १२ आरोपीतांविरूध्द कारवाई करून १२ गुन्हें नोंद केले आहे.

**आरोपी क्रं १) मोहम्मद सलीम मोहम्मद अफजल अंसारी, वय २४ वर्ष, रा. कामठी गोल्ड बाजार मैदान कामठी जि.नागपूर, आरोपी क्र.२) नामे रोशन रमेश भजने वय २१ वर्ष, रा. माकडे नगर तुमसर जि.भंडारा, आरोपी क्रं ३) नामे दिक्षांत महेंद्र वासनीक, वय १९ वर्ष, रा. सितेपार खैरलांजी ता.तुमसर जि.भंडारा, आरोपी क्रं ४) नामे शेख शारूख शेख सलीम, वय २९ वर्ष, रा. मोमीनपुरा ईदगहा, आंबेडकर भवन चे जवळ नागपूर जि.नागपूर आरोपी क्रं ५) नामे शेख शारूख शेख रफीक, वय २४ वर्ष, रा.मोमीनपुरा, डोबीनगर आंबेडकर भवन चे जवळ नागपूर जि.नागपूर, आरोपी क्रं ६) नामे मोहम्मद सुफीयान मोहम्मद अब्दुल रशीद, वय २२ वर्ष,रा. मोमीनपुरा ईदगाह आंबेडकर भवन चे जवळ नागपूर जि.नागपूर आणि आरोपी क्रमांक ७) नामेशेख सलमान शेख अहमद, वय २५ वर्ष,रा.मोमीनपुरा अन्सास नगर,नागपूर जि.नागपूर ,आरोपी क्रं ८) राज विनोद रजक, वय १८ वर्ष, रा. वानाडोंगरी, ता. हिंगणा, टोल नाक्याजवळ, एमआयडीसी, नागपूर, आरोपी क्र.९) नामे आदीत्य मुकेश गजभिय, वय २२ वर्षे, रा. हिंगणा**

**पोलीस स्टेशन चे मागे, नागपूर, आरोपी क्रं १०) नामे मोसीन खान नसिर खान, वय ३६ वर्ष, रा. यशोधरा नगर, शिवनगर, उप्पलवाडी नागपूर , आरोपी क्रं ११) नामे राजकुमार सुरेश क्षीरसागर, वय ३५ वर्ष, रा. संगम सावंगा. ता. सौंसर, पोस्टे लोधीखेडा, जिल्हा पांढूर्णा, राज्य मध्यप्रदेश आणि आरोपी क्रं १२) नामे मोहम्मद नौशाद मोहम्मद कबीर शेख, वय ३९ वर्ष, रा. अरविंद नगर, नागपूर हे १२ आरोपी मौजा मोरफाटा दर्गा चे मागे चिल्लम मध्ये गांजा पितांना मिळुन आले.**

नमुद १२ आरोपतांवर पोलीस स्टेशन देवलापार येथेकलम २७ एन.डी.पी.एस. कायदयान्वये १२ गुन्हें नोंद करण्यात आले आहे.

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**